# पोलीस आयुक्त कार्यालय

कक्ष -९ (कनिष्ठ आस्थापना / भरती कक्ष),

नवीन प्रशासकीय इमारत, दुसरा मजला, डॉ दा.नौ.मार्ग, बृहन्मुंबई — ४००००१

दुरध्वनी क्र. ०२२ २२६२०१११, विस्तारीत क्र. ७०४ ई-मेल– desk9recruitcell.mum@mahapolice.gov.in


जा.क्र.पोआ/कक्ष-९(पोभ)/९(१)/1882/२०२४, दि. 02 / ०८ /२०२४.

## मुंबई पोलीस शिपाई (चालक) भरती — २०२२-२३

विषय : - **मुंबई पोलीस शिपाई (चालक) भरती — २०२२-२३**
गैरहजर/अनुपस्थित असलेल्या **महिला उमेदवारांना** शारिरीक मोजमाप व मैदानी चाचणी करिता अंतिम संधी उपलब्ध करुन देण्याबाबत.

संदर्भ :- क्र.अपोमसं/प्रशिक्षण/पो.शि.भरती २०२२-२३/१७३/२०२३, दिनांक ०६/०६/२०२४.

मुंबई पोलीस शिपाई (चालक) भरती — २०२२-२३ करिता महिला उमेदवारांची शारिरीक मोजमाप व मैदानी चाचणी प्रक्रिया दिनांक १९/०७/२०२४ ते २८/०७/२०२४ या कालावधीत मुंबई विद्यापीठ क्रिडा संकूल, मरीन लाईन्स, मुंबई येथील मैदानावर पूर्ण करण्यात आली आहे. तथापि सदर कालावधीत ज्या महिला उमेदवार शारिरीक मोजमाप व मैदानी चाचणी करिता उपस्थित राहू शकल्या नाहीत अथवा ज्या महिला उमेदवारांनी दिलेल्या दिनांकास गैरहजर असल्यामुळे/अथवा उपस्थित राहू शकत नसल्यामुळे पुढील दिनांक देण्याची विनंती केली आहे अशा महिला उमेदवारांना शारिरीक मोजमाप व मैदानी चाचणीकरिता दिनांक १४/०८/२०२४ रोजी बोलविण्यात येत आहे.

**पोलीस शिपाई (चालक) महिला** उमेदवारांची शारिरीक मोजमाप व मैदानी चाचणी प्रक्रिया दिनांक २८/०७/२०२४ रोजी संपली आहे. त्यामुळे उपरोक्त नमूद कालावधीत ज्या महिला उमेदवार शारिरीक मोजमाप व मैदानी चाचणीकरिता गैरहजर/अनुपस्थित होत्या अशा महिला उमेदवारांनी मुंबई विद्यापीठ क्रिडा संकूल, मरीन लाईन्स, मुंबई येथील मैदानावर दिनांक १४/०८/२०२४ रोजी सकाळी ११.०० वा. न चुकता उपस्थित रहावे, सदरची संधी ही अंतिम असून सदर उमेदवारांना पुन्हा कोणत्याही परिस्थतीत संधी देण्यात येणार नाही.

सर्व संबंधित उमेदवारांनी मैदानी चाचणी व शारिरीक मोजमाप प्रक्रियेकरिता मैदानी चाचणीचे ओळखपत्र तसेच इतर ओळखपत्र (आधार कार्ड/चालक परवाना/पॅनकार्ड इ.) घेऊन वेळेत उपस्थित राहावे. या आस्थापनेवरील भरती प्रक्रियेची मैदानी चाचणी **(Synthetic track)** वर घेण्यात येत असल्याने कोणत्याही उमेदवारांस **स्पाईक शुज (Spike shoes) वापरता येणार नाही. Synthetic track वर कुठलीही अडचण निर्माण होणार नाही, याप्रमाणे Sports shoes वापरावे.**

सर्व संबंधित उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**( नवनाथ ढवळे )**
पोलीस उप आयुक्त (मुख्या-२)
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे कार्यालय.

पोलीस आयुक्त
मुंबई